आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२४ मार्च २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्मीयांनाच अनुसुचित जातीचा दर्जा मिळू शकेल, असा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा

- पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाचे परिणाम दीर्घकाळ जाणवण्याची शक्यता असल्यानं एकजूट दाखवण्याचं प्रधानमंत्र्यांचं राज्यसभेत आवाहन,

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी चर्चा

- रेल्वे तिकीट रद्द करण्याच्या शुल्कात बदल, ८ तास आधी तिकीट रद्द केलं तर कुठलाही परतावा नाही

आणि

- पारलिंगी व्यक्ती हक्क संरक्षण सुधारणा विधेयक मंजूर

**<><><><><>**

हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माची अनुयायी असणारी व्यक्तीच अनुसूचित जातीच्या दर्जासाठी दावा करू शकेल. ख्रिस्ती धर्मासारख्या इतर कोणताही धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तिचा अनुसूचित जाती दर्जा रद्द होईल, असं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. या तीन धर्मांव्यतिरिक्त इतर धर्म स्वीकारलेली कोणतीही दलित व्यक्ती अनुसूचित जाती आणि जमातींवरच्या अत्याचार प्रतिबंधक कायद्याचं उल्लंघन झाल्याचा दावा करू शकत नाही, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

आंध्र प्रदेशातल्या एका ख्रिस्ती धर्मगुरूनं उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठानं आज हा निर्णय दिला.

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या गंभीर परिस्थितीचे परिणाम दीर्घकाळ राहतील, त्यामुळे आपल्याला अशा परिस्थितीसाठी एकजूट दाखवावी लागेल, याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राज्यसभेत केला. कोरोना काळात दाखवलेली एकजूट

आपल्याला पुन्हा एकदा दाखवावी लागेल, असं आवाहन त्यांनी देशवासियांना केलं. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे देशासमोर गंभीर उर्जा संकट निर्माण झालं आहे. त्यामुळं इंधन, पुरवठा साखळ्या आणि खतं यांसारख्या घटकांवर धोरणं आखण्यासाठी सरकारनं ७ अधिकारप्राप्त गटांची स्थापना केली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. भारतानं युद्धाच्या सुरुवातीपासूनच संबंधित देशांच्या अध्यक्षांशी संपर्कात राहून शांततेसाठी प्रयत्न केले आहेत, तसंच व्यावसायिक जहाजं आणि होर्मुझची अडवणूक स्वीकारार्ह नाही, असंही मोदी म्हणाले.

**- - होल्ड.. बाईट- प्रधानमंत्री - - -**

**- <><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या संदर्भात अमेरिकेचे अध्यक्ष ड़ोनाल्ड ट्रम्प यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केली. संघर्ष कमी होऊन लवकरात लवकर शांतता प्रस्थापित व्हावी, होर्मुझची सामुद्रधुनी खुली रहावी आणि जहाजांचे सुरक्षित आवागमन सुरु रहावे यावर प्रधानमंत्र्यांनी या चर्चेत भर दिला.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्लीत संरक्षण प्रमुख, सर्व संरक्षण दलांचे प्रमुख, संरक्षण सचिव, डीआरडीओचे अध्यक्ष यांच्याबरोबर बैठक घेतली आणि पश्चिम आशियाच्या परिस्थितीचा भारताच्या संरक्षण सज्जतेवर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेतला. या बैठकीत सिंह यांनी जागतिक आणि प्रादेशिक पातळीवरची सुरक्षा स्थिती, संघर्ष वाढल्यास त्याचा भारतावर होणारा संभाव्य परिणाम, सध्याच्या भू-राजकीय परिस्थीमुळे निर्माण झालेली आव्हानं यांबद्दल माहिती घेतली. तसंच, विद्यमान संरक्षण उपकरणांची देखभाल आणि कार्यक्षमता यांसाठीच्या पुरवठा साखळी व्यवस्थापनावर सद्यस्थितीच्या परिणामाचा अभ्यास करावा, असे निर्देश सिंह यांनी दिले.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पश्चिम आशियात युद्धविरामाची घोषणा केल्याचा सकारात्मक परिणाम आज देशभरातल्या शेअर बाजार दिसला. सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ३७२ अंकांची वाढ झाली आणि तो ७४ हजार ६८ अंकांवर बंद झाला. निफ्टीही ४०० अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ९१२ अंकांवर बंद झाला. मात्र

युद्धाची परिस्थिती अजून पूर्ण स्पष्ट झाली नसल्यानं खबरदारी घेण्याचा सल्ला विश्लेषकांनी दिला आहे.

दरम्यान, कच्च्या तेलाच्या किंमती आज घसरल्या तर सोनं आणि चांदी महाग झालं.

**<><><><><>**

इराण-इस्रायल युद्ध संपवण्यासाठी अर्थपूर्ण आणि निर्णायक चर्चांना मदत करण्यासाठी पाकिस्तान तयार असल्याचं पाकिस्तानचे प्रधानमंत्री शाहबाझ शरीफ यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. काही पाकिस्तानी आणि इजिप्शियन अधिकाऱ्यांच्या मते पाकिस्तानमध्ये चर्चेत सहभागी होण्यासाठी अमेरिका तत्वतः तयार होती तर मध्यस्थ अजूनही इराणचं मन वळवण्याचा प्रयत्न करत होते. मात्र ही माहिती बाहेर आल्यानं पडद्यामागे होणारी ही गुप्त चर्चा अधिक गुंतागुंतीची झाल्याचं पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर फिलिपिन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनंड मार्कोस जुनिअर यांनी आपल्या देशात राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी जाहीर केली आहे. या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात अनिश्चितता निर्माण झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. आणीबाणी जाहीर केल्यामुळे सरकारला तात्काळ आणि समन्वित उपाययोजना राबवता येतील, हे त्यांनी स्पष्ट केलं. ही आणीबाणीची घोषणा १ वर्षासाठी लागू राहणार आहे.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेनं तिकीट रद्द करण्याच्या शुल्कात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवासाला ८ तास शिल्लक असताना रेल्वेचं तिकिट रद्द केलं तर कुठलाही परतावा मिळणार नाही, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली.

**होल्ड - रेल्वे मंत्री बाइट**

सध्या ४ तास आधी तिकिट रद्द केलं तर कुठलाही परतावा मिळत नाही. प्रवास सुरू व्हायला ७२ तासापेक्षा कमी वेळ आणि २४ तासापेक्षा जास्त वेळ शिल्लक असेल तर रेल्वेच्या भाड्याच्या २५ टक्के शुल्क आकारले जाईल. सध्या ४८ तासापेक्षा जास्त आणि १२ तासापेक्षा कमी कालावधीत तिकिट रद्द केलं तर २५ टक्के शुल्क कापले जाते. प्रवासाला सुरुवात करायला २४ तासापेक्षा जास्त आणि ८ तासापेक्षा कमी वेळ शिल्लक असेल तर

५० टक्के रद्दीकरण शुल्क आकारले जाईल. सध्या १२ तासापेक्षा कमी आणि ४ तासापेक्षा जास्त वेळ असेल तर ५० टक्के शुल्क आकारले जात होते.

प्रवाशांच्या सुविधेसाठी प्रवास सुरू व्हायच्या अर्धा तास आधीपर्यंत प्रवास सुरू करण्याचे ठिकाण बदलण्याची सुविधा रेल्वेनं उपलब्ध करुन दिली आहे. यापूर्वी चार्ट तयार व्हायच्या आधीच प्रवास सुरू करण्याचे ठिकाण बदलता येत होते.

<><><><>

लष्कर, नौदल आणि वायुदलात शॉर्ट सर्व्हिस कमिशन अंतर्गत काम करणाऱ्या महिला अधिकाऱ्यांना सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्यासाठी कोणत्याही योग्य मूल्यांकन प्रक्रियेशिवाय नकार दिला असल्यास अशा अधिकाऱ्यांना आता संपूर्ण निवृत्तिवेतनाचा लाभ मिळणार असल्याचा निर्णय आज सर्वोच्च न्यायालयानं दिला. या महिला अधिकाऱ्यांना आधीच सेवामुक्त केलं असलं तरीही प्रत्यक्षात त्यांनी २० वर्षांची सेवा पूर्ण केल्याचं मानलं जाईल, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील पीठानं स्पष्ट केलं.

<><><><>

लोकसभेत आज पारलिंगी व्यक्ती हक्क संरक्षण सुधारणा विधेयक मंजूर झालं. यानुसार, एखादी पारलिंगी व्यक्ती स्वतःची ओळख पटवणारं प्रमाणपत्र मिळवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करू शकते. वैद्यकीय मंडळाच्या शिफारशीची तपासणी केल्यानंतरच जिल्हाधिकारी हे प्रमाणपत्र जारी करतील. पारलिंगी व्यक्तींना जन्मदाखल्यात किंवा इतर अधिकृत कागदपत्रांमधलं स्वतःचं नाव बदलण्याचा अधिकार या विधेयकातून मिळेल.

पारलिंगी समुदायाशी चर्चा केल्याशिवाय हे विधेयक आणल्याचं सांगत काँग्रेसच्या एस. ज्योतीमणी यांनी या विधेयकाला विरोध केला. समाजवादी पार्टीचे आनंद भदौरिया, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनीही या विधेयकाला विरोध दर्शवत प्रवर समितीकडे पाठवण्याची मागणी केली होती.

<><><><>

नवी मुंबईतल्या फ्लेमिंगो अधिवासाच्या ठिकाणांची हेळसांड होत असल्याप्रकरणी केंद्रीय पर्यावरण वने आणि हवामान बदल मंत्रालयाने महाराष्ट्र राज्य पाणथळ जागा प्राधिकरणाला याबाबतचा अहवाल सादर करायला सांगितलं आहे.

**<><><><><>**

अनुसुचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत महागाई निर्देशांकानुसार वाढ करावी, अशी सूचना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. त्यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीत भेट घेतल्यावर त्यांनी ही सूचना केली. या शिष्यवृत्तीच्या रकमेत गेल्या १५ वर्षापासून वाढ केलेली नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

जनगणना करताना महाराष्ट्रातल्या धर्मांतरीत बौध्दांच्या बाबतीत जातीच्या रकान्यात जातीचं नाव न लिहीता पूर्वाश्रमीच्या अनुसूचित जातीचा अनुक्रमांक लिहावा, अशी सूचनाही त्यांनी केली. या दोन्ही विषयावर प्रधानमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचं आठवले यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**